१) राष्ट्रीय सेवा योजना विद्यार्थी श्रमशक्तीद्वारे राबविण्यात आलेले कार्यक्रम :

- संत्रारंभ सभा (कार्यक्रम अधिकारी प्रशिक्षण कार्यशाळा)
- कार्यक्रम अधिकारी यांच्यासाठी माय भारत पोर्टल प्रशिक्षण कार्यशाळा
- राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय शिबिरांसाठी जिल्हा आणि विद्यापीठ स्तरावरील निवड चाचणी शिबिर
- स्वच्छता ही सेवा उपक्रम
- एक पेड माँ के नाम वृक्ष लागवड उपक्रम
- माय भारत पोर्टल अभियान आणि नोंदणी
- जागतिक एड्स प्रतिबंध व नियंत्रण रॅली आणि रेड रिबन क्लबची स्थापना
- रक्तदान आणि रक्तगट, आरोग्य तपासणी शिबिर
- डिजिटल कृषी विषयक अनुभवात्मक शिक्षण कार्यक्रम
- राष्ट्रीय पोषण माह
- स्थानिक समुदायिक स्थळे दत्तक उपक्रम
- रस्ता सुरक्षा अभियान जागरूकता कार्यक्रम
- हर घर तिरंगा अभियान
- दत्तक ग्राममध्ये विशेष श्रमसंस्कार शिबिर (७ दिवस).
- आंतरराष्ट्रीय योग दिवस
- आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण
- प्रजासत्ताक दिन परेड निवड शिबिर
- जिल्हास्तरीय विकसित भारत युथ पार्लमेंट
- मरणोत्तर नेत्रदान जनजागृती
- संविधान गौरव महोत्सव
- बेटी बेचाओ, बेटी पढाओ उपक्रम
- जिल्हास्तरीय युवा महोत्सव स्पर्धा

राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील शिबिरांमध्ये स्वयंसेवकांचा सहभाग

- राष्ट्रीय साहसी शिबिर (धर्मशाला, हिमाचल प्रदेश)
- पूर्व गणतंत्र दिन पथसंचलन निवड चाचणी शिबिर (स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड)
- वेस्ट झोन आर. डी. परेड कॅम्प (कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)
- 'आव्हान-चॅन्सेलर्स ब्रिगेड' आपत्ती व्यवस्थापन शिबिर (संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती)
- राज्यस्तरीय आर.डी. पथसंचलन शिबिर (मुंबई)
- प्रेरणा - नेतृत्व आणि व्यक्तिमत्व विकास शिबिर (पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर)
- उत्कर्ष सामाजिक सांस्कृतिक स्पर्धा व महोत्सव (सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे)
- राष्ट्रीय आर.डी. पथसंचलन (दिल्ली)
- राज्यस्तरीय विकसित भारत युथ पार्लमेंट (मुंबई)

जिल्हानिहाय राष्ट्रीय सेवा योजना स्वयंसेवक संख्या

अ.क्र.	जिल्ह्याचे नाव	महाविद्यालयाची संख्या	विद्यार्थी संख्या
१.	अमरावती	६९	९७५०
२.	अकोला	२८	३५५०
३.	बुलडाणा	५२	५३००
४.	यवतमाळ	४६	५७५०
५.	वाशिम	२३	३२५०
	एकूण	**२१८**	**२७,६००**

२) शिबिर / उपक्रम / सभा :

अ.क्र.	शिबिर / उपक्रम / सभा व स्थळ	दिनांक	निवड झालेल्या/सहभागी कार्यक्रम अधिकारी/विद्यार्थ्यांचे व महाविद्यालयाचे नाव/ संख्या
१	२	३	४
विद्यापीठस्तरीय कार्यक्रम :			
१.	**जिल्हा समन्वयक सभा**	१८/०७/२०२४	दि. १८/०७/२०२४ रोजी अमरावती शहर, अमरावती ग्रामीण, अकोला, बुलडाणा, यवतमाळ व वाशिम जिल्ह्याच्या जिल्हा समन्वयक यांची सभा आयोजित करण्यात आली होती. सदर सभेमध्ये रासेयो नियमित तसेच विशेष शिबिर कार्यक्रमांचे वार्षिक आयोजन व नियोजनाबाबत चर्चा करण्यात आली तसेच केंद्र व राज्य शासनाच्या आयोजित शिबिरांकरिता जिल्हास्तरीय व विद्यापीठस्तरीय विद्यार्थ्यांच्या निवड चाचणी आयोजनाचे ठिकाण, तारखा व परीक्षक ठरविण्यात आले.
२.	**छत्रपती शिवाजी महाराज राज्यभिषेकाचा ३५० व्या वर्षांचा समापन सोहळा**	०३/०८/२०२४	छत्रपती शिवाजी महाराज राज्यभिषेकाच्या ३५० व्या वर्षाच्या समापन सोहळ्यानिमित्त "छत्रपती शिवाजी महाराज : भारतीय युवकासाठी दिपस्तंभ" या विषयावार व्याख्यानाचे आयोजन मा. कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०३/०८/२०२४ रोजी डॉ. श्रीकांत जिचकार मेमोरिअल हॉल, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे आयोजित करण्यात आले असून सदर कार्यक्रमामध्ये डॉ. सतपाळ सोवळे यांनी मार्गदर्शन केले. सदर कार्यक्रमासाठी अमरावती शहरातील महाविद्यालयांमधून १७५ रासेयो स्वयंसेवक उपस्थित होते.
३.	**आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण** (जिल्हाधिकारी कायार्लय अमरावती)	११/०८/२०२४	दि. ११/०८/२०२४ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, अमरावती येथील जिल्हा आपत्ती व्यवस्थापन कक्षामध्ये आपत्ती व्यवस्थापन प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

१	२	३	४
			सदर कार्यक्रमामध्ये १५० रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला व प्रशिक्षण घेतले.
४.	**आव्हान, साहसी, एकात्मता, युवा महोत्सव, प्रेरणा, उत्कर्ष शिबिर पूर्व प्रजासत्ताक दिन पथसंचलन इत्यादी राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय शिबिरांसाठी जिल्हास्तरीय निवड चाचणीचे आयोजन**	२७/०८/२०२४ ते ०१/०९/२०२४	सत्र २०२४-२५ करिता राज्य व केंद्र शासनाच्या आयोजित आव्हान, साहसी, एकात्मता, युवा महोत्सव, प्रेरणा, उत्कर्ष शिबिर, पूर्व प्रजासत्ताक दिन पथसंचलन इत्यादी शिबिरांसाठी विद्यार्थ्याच्या निवडीकरिता पथमतः जिल्हास्तरीय निवड चाचणीचे आयोजन दि.२७/०८/२०२४ ते ०१/०९/२०२४ या कालावधीमध्ये खाली दिलेल्या संलग्नित महाविद्यालयांमध्ये करण्यात आले. सदर शिबिरांसाठी विद्यार्थ्यांच्या निवडीकरिता नियुक्त परीक्षकांनी शिबिराच्या निकषांनुसार सांस्कृतिक गटामधुन १०५ व शारीरिक सक्षम गटामधुन २०५ असे एकूण ३१० विद्यार्थ्यांची विद्यापीठस्तरीय निवड चाचणीकरिता निवड करण्यात आली. **जिल्हा — ठिकाण** अमरावती शहर — शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती. अमरावती ग्रामीण — गो. सी. टोम्पे कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, चांदुर बाजार. अकोला — सीताबाई कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला व श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोला. बुलडाणा — माऊली ग्रृप ऑफ कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉली, शेगाव. यवतमाळ — अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ. वाशिम — श्री सरस्वती समाजकार्य महाविद्यालय, वाशिम.
५.	**आव्हान, साहसी, एकात्मता, युवा महोत्सव, प्रेरणा, उत्कर्ष शिबिर पूर्व प्रजासत्ताक दिन पथसंचलन शिबिर इत्यादी राष्ट्रीय आणि राज्यस्तरीय कार्यक्रमांसाठी विद्यापीठस्तरीय निवड शिबिर**	०५/०९/२०२४	संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करण्यासाठी शासनामार्फत आयोजित राज्य आणि राष्ट्रीय स्तरावरील शिबिरे जसे की, आव्हान, साहसी, एकात्मता, युवा महोत्सव, प्रेरणा आणि उत्कर्ष इ. शिबिरांसाठी प्रथमतः जिल्हास्तरीय व तद्नंतर विद्यापीठस्तरावरील निवड चाचणीमधून रासेयो स्वयंसेवकांची निवड केली जाते. सत्र २०२४-२५ करिता विद्यापीठस्तरीय निवड चाचणीचे आयोजन दि.०५/०९/२०२४ रोजी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ,

१	२	३	४
			अमरावती येथे आयोजित करण्यात आले. यावेळी उद्घाटन कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी मा. कुलगुरू, डॉ. मिलिंद बारहाते उपस्थित होते. राज्य व केंद्र शासनाच्या शिबीरांकरिता दिलेल्या निकषानुसार जिल्हास्तरीय निवड चाचणीतून निवड करण्यात आलेल्या सांस्कृतिक गटाकरिता १०५ व शारीरिक सक्षम गटाकरिता २०५ विद्यार्थ्यांनी विद्यापीठस्तरीय निवड चाचणीमध्ये सहभाग नोंदविला. त्यामधून उत्कर्ष शिबिराकरिता १८ (०९ मुले व ०९ मुली), प्रेरणा शिबिराकरिता १० (०५ मुले व ०५ मुली), राष्ट्रीय एकात्मता शिबिराकरिता १८ (०९ मुले व ०९ मुली), राष्ट्रीय युवा महोत्सवाकरिता १० (०५ मुले व ०५ मुली), पूर्व गणतंत्र दिन पथसंचलनाकरिता २४ (१२ मुले व १२ मुली), राष्ट्रीय साहसी शिबिराकरिता ०४ (०२ मुले व ०२ मुली), राज्यस्तरीय साहसी शिबिराकरिता १० (०५ मुले व ०५ मुली) व आव्हान शिबिराकरिता १२५ (७५ मुले व ५० मुली) विद्यार्थ्यांची तज्ञ परिक्षकाद्वारे निवड करण्यात आली.
६.	**कार्यक्रम अधिकारी सभा** (सत्रारंभ सभा)	१०/०४/२०२४ आणि १५/१०/२०२४	दिनांक १४/१०/२०२४ रोजी अमरावती व अकोला जिल्ह्यातील रासेयो कार्यक्रम अधिकारी व दिनांक १५/१०/२०२४ रोजी बुलडाणा, यवतमाळ व वाशिम जिल्ह्यातील रासेयो कार्यक्रम अधिकारी करिता सत्रारंभ सभेचे आयोजन विद्यापीठाच्या दृकश्राव्य सभगृहामध्ये करण्यात आले. या सभेला एकूण २१८ रासेयो एकक संलग्नित महाविद्यालयातील महिला व पुरुष कार्यक्रम अधिकारी असे एकुण ४३६ कार्यक्रम अधिकारी उपस्थित होते. या सभेमध्ये कार्यक्रम अधिका-यांना रासेयो कार्यक्रम वार्षिक दिनदर्शिका, रा.से.यो. अनुदान खर्चाचे नियोजन, खर्चाचे लेखे व उपयोगिता प्रमाणपत्र, नियमित कार्यक्रम अहवाल, विशेष शिबिर कार्यक्रम अहवाल आणि रा.से.यो. संबंधित कागदपत्रांवर मार्गदर्शन करण्यात आले. केंद्र व राज्य शासनाकडून आयोजित करण्यात येणा-या विविध शिबिरांची माहिती कार्यक्रम अधिकारी यांना देण्यात आली. तसेच शासनाच्या अनुदान वितरणाच्या पीएफएमएस प्रणालीचे प्रशिक्षण व शासनाच्या माय भारत पोर्टलवर महाविद्यालयाची व विद्यार्थ्यांची नोंदणी बाबत प्रशिक्षण देण्यात आले.
७.	**विद्यापीठस्तरीय पुरस्कार वितरण समारंभ**	१४/१०/२०२४	कार्यक्रम अधिकारी सत्रारंभ सभेमध्ये विद्यापीठ स्तरीय पुरस्कार वितरण समारंभ दि. १४/१०/२०२४ रोजी दृकश्राव्य सभागृह, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अमरावती

१	२	३	४
			येथे आयोजित करण्यात आला. सदर पुरस्कार वितरण सोहळ्यामध्ये जिल्हास्तरीय उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी (पुरुष व महिला), जिल्हास्तरीय उत्कृष्ट स्वयंसेवक (मुले व मुली), विद्यापीठस्तरीय उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी व स्वयंसेवक पुरस्कारांचे वितरण स्मृतीचिन्ह व प्रमाणपत्र देऊन करण्यात आले.
८.	**जिल्हास्तरीय युवा महोत्सव सभा**	१४/१०/२०२४	क्रीडा व युवक सेवा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे व रासेयो विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे संयुक्त विद्यमाने दिनांक २९/११/२०२४ रोजी कौशल्य विकास स्पर्धा व दिनांक ०४/१२/२०२४ रोजी सांस्कृतिक स्पर्धा, युवा कृती स्पर्धा व संकल्पना आधारित स्पर्धा मातोश्री विमलाबाई देशमुख सभागृह, अमरावती येथे स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेमधून विभागीय युवा महोत्सव करिता स्पर्धकांची निवड करण्यात आली.
९.	**विद्यापीठ रासेयो सल्लागार समिती सभा**	०३/०३/२०२५	सत्र २०२४-२५ करिता सल्लागार समितीचे आयोजन दि. ०३ मार्च, २०२५ रोजी करण्यात आले. मा. कुलगरू डॉ. मिलिंद बारहाते यांचे अध्यक्षतेखाली विद्यापीठ सल्लागार समितीची सभा पार पडली. सदर सभेमध्ये मागील सल्लागार समितीचे कार्यवृत्त कायम करणे, कार्यवृत्तावरील अनुपालन अहवालाची नोंद घेणे, विद्यापीठ व महाविद्यालयीन स्तरावर आयोजित नियमित व विशेष शिबिर कार्यक्रमाच्या अहवालाची नोंद घेणे, रासेयो प्राप्त अनुदानावर झालेल्या खर्चाचे उपयोगिता प्रमाणपत्राची अर्थीक नोंद घेणे, सत्र २०२४-२५ चे प्रस्तावित अंदाजपत्रकास मान्यता प्रदान करणे. नवीन पथक/वाढीव पथकाची मान्यता घेणे, अकार्यक्षम रासेयो पथक कमी अथवा बंद करण्याची मान्यता घेणे. ई. बाबींवर चर्चा करण्यात आली. सदर सभेला केंद्र शासनाच्या क्षेत्रीय संचालनालय, पुणे कार्यालयाचे क्षेत्रीय संचालक डॉ. अजय शिंदे उपस्थित होते.
१०.	**जिल्हास्तरीय विकसित भारत युथ पार्लमेंट-२०२५**	२०/०३/२०२५ व २१/०३/२०२५	केंद्र शासनाच्या जिल्हास्तरीय विकसित भारत युथ पार्लमेंट २०२५ चे आयोजन दिनांक २० व २१ मार्च, २०२५ रोजी विद्यापीठाच्या डॉ. श्रीकांत जिचकार मेमोरिअल हॉल येथे करण्यात आले. सदर युथ पार्लमेंट करिता अमरावती, अकोला, यवतमाळ व वाशिम या जिल्ह्यातील १८ ते २५ वयोगटातील विद्यार्थ्यांकडून 'विकसित भारत म्हणजे तुमच्यासाठी काय?' या विषयावर दिनांक १६/०३/२०२५ पर्यंत १ मिनिटाचा

१	२	३	४
			व्हिडिओ शासनाच्या माय भारत पोर्टलवर मागविण्यात आला होता. त्यामधून दिनांक १७/०३/२०२५ रोजी स्क्रिनिंग कमिटीद्वारे १५० विद्यार्थ्यांची जिल्हास्तरीय विकसित भारत युथ पार्लमेंट करिता निवड करण्यात आली. जिल्हास्तरीय निवड झालेल्या विद्यार्थ्यांची दिनांक २० व २१ मार्च, २०२५ रोजी विद्यापीठामध्ये **'एक राष्ट्र, एक निवडणूकः विकसित भारताचा मार्ग मोकळा करत आहे'** या विषयावर प्रत्यक्ष ०३ मिनिटाचे सादरीकरण केले. विद्यापीठामार्फत नियुक्त करण्यात आलेल्या परीक्षकांद्वारे 'राज्यस्तरीय विकसित भारत युथ पार्लमेंट-२०२५' करिता खालील १० विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली. १. कु. श्रेया पाठक २. कु. वैष्णवी राठोड ३. कु. दिव्या गजानन विधाते ४. श्री. यश किशोर चव्हाण ५. कु. श्रेया ठाकुर ६. कु. नफीसा हुसेन ७. कु. गौरी संजय काळमेघ ८. कु. क्रितीका चौधरी ९. कु. आयुषी ठाकुर १०. कु. पुर्वा गजानन मानकर
राज्यस्तरीय कार्यक्रम व शिबिरे			
११.	**राज्यस्तरीय पुरस्कार**	१४/०८/२०२४	महाराष्ट्र शासनाचे २०२२-२३ चे राष्ट्रीय सेवा योजना राज्यस्तरीय पुरस्कार दिनांक १४ ऑगस्ट रोजी जाहीर झाले. त्यामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठा अंतर्गत शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती येथील रासेयो कार्यक्रम अधिकारी डॉ. मिलिंद काळे यांनी कार्यक्रम अधिकारी प्रशंसा प्रमाणपत्र पुरस्कार (प्रमाणपत्र व स्मृतिचिन्ह या संवर्गामध्ये पुरस्कार) प्राप्त केला. तसेच शासकीय विदर्भ ज्ञान विज्ञान संस्था, अमरावती या महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेविका कु. रेणुका तुळशिराम ढोणे हिने सर्वोत्कृष्ट स्वयंसेवक पुरस्कार (प्रमाणपत्र, स्मृतिचिन्ह व रु. २०००/- या संवर्गामध्ये पुरस्कार) प्राप्त केला
१२.	**माय भारत पोर्टल प्रशिक्षण**	३१/०८/२०२४	युवा कार्य व खेल मंत्रालय, भारत सरकार द्वारा माय भारत पोर्टल बाबत संपूर्ण ज्ञान व प्रशिक्षण अवगत होण्यासाठी व माय भारत पोर्टल चे ट्रेनर म्हणून कार्य करण्यासाठी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठा अंतर्गत महाविद्यालयातील एकूण १२ रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी जी. एच. रायसोनी कॉलेज ऑफ इंजिनिअरींग, नागपूर येथे प्रशिक्षणासाठी सहभाग नोंदविला.

१	२	३	४
१३.	**पूर्व गणतंत्र दिन पथसंचलन निवड चाचणी शिबिर** (स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड)	२६/०९/२०२४ ते २८/०९/२०२४	महाराष्ट्र शासनाच्या रासेयो विभागा अंतर्गत पूर्व गणतंत्र दिन पथसंचलन निवड चाचणी शिबिर स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या ठिकाणी दि. २६/०९/२०२४ ते २८/०९/२०२४ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठा अंतर्गत महाविद्यालयांतील १२ मुले व १२ मुली रासेयो स्वयंसेवक व ०२ कार्यक्रम अधिकारी यांनी सहभाग घेतला. सदर शिबिरामधून शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे आयोजित गणतंत्र दिन पथसंचलनाकरिता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे ०३ मुले आणि ०३ मुलीं रासेयो स्वयंसेवक यांची निवड करण्यात आली.
१४.	**'आव्हान-चॅन्सेलर्स ब्रिगेड'** (महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबिर) २०२४	०७/११/२०२४ ते १६/११/२०२४	सन २०२४ मधील महामहीम राज्यपाल तथा मा. कुलपती, राजभवन, मुंबई यांचे कार्यालयामार्फत आयोजित 'आव्हान-मराठवाडा विद्यापीठ, नांदेड या ठिकाणी दि. २६/०९/२०२४ चॅन्सेलर्स ब्रिगेड' (महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबिर) चे यजमानपद संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला प्राप्त झाले. विद्यापीठामार्फत 'आव्हान-चॅन्सेलर्स ब्रिगेड' (महाराष्ट्र राज्य आंतर विद्यापीठ आपत्ती पूर्वतयारी प्रशिक्षण शिबिर) २०२४ चे दि. ०७/११/२०२४ ते १६/११/२०२४ या कालावधीमध्ये आयोजन करण्यात आले. सदर शिबिरामध्ये महाराष्ट्रातील एकूण २२ विद्यापीठामधून (५३१ मुले व ३६३ मुली) असे एकूण ८९४ स्वयंसेवक आणि (३५ पुरुष व २६ महिला) असे एकूण ६१ कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले होते. सदर शिबिरामध्ये विद्यार्थ्यांना व कार्यक्रम अधिका-यांना आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षण एन.डी.आर.एफ., पुणे येथील टिमद्वारे देण्यात आले.
१५.	**वेस्ट झोन आर.डी. परेड कॅम्प** (कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव)	११/११/२०२४ ते २१/११/२०२४	वेस्ट झोन आर. डी. परेड कॅम्पचे आयोजन कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव या ठिकाणी दि. ११/११/२०२४ ते २१/११/२०२४ या कालावधीत करण्यात आले. त्यामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठा अंतर्गत महाविद्यालयांतील ०३ मुले व ०३ मुली रासेयो स्वयंसेवक यांनी सहभाग घेतला. यामधून श्री. रा. ल. तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील कु. लिना विठ्ठल अवथळे हिची २६ जानेवारी, २०२५ रोजी दिल्ली येथे होणा-या प्रजासत्ताक दिन परेड (आर.डी.परेड) करिता राष्ट्रीय संघात निवड झाली.

१	२	३	४
१६.	**महाराष्ट्र राज्य आर. डी. परेड कॅम्प** (मुंबई)	१७/०१/२०२५ ते २६/०१/२०२५	शिवाजी पार्क, दादर, मुंबई येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य प्रजासत्ताक दिनाच्या परेडमध्ये ०३ मुले आणि ०३ मुलींनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले. • कु. जान्हवी वि. गाढे राजर्षी शाहू कॉलेज ऑफ फार्मसी, बुलडाणा. • कु. मयुरी वि. नाईक गो.सी.टोम्पे महाविद्यालय, चांदुर बाजार. • कु. सीया सु. हरणे प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा • श्री. उमेदखॉ जा. पठान शि.प्र.मं. स्व. तात्यासाहेब महाजन महाविद्यालय, चिखली. • श्री. सुपेश दि. दिवाने जिजामाता महाविद्यालय, बुलडाणा • श्री. कमलेश वि. तंतरपाळे भारतीय महाविद्यालय, मोर्शी.
१७.	**उत्कर्ष सामाजिक सांस्कृतिक महोत्सव** (साबित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे)	२३/०२/२०२५ ते २५/०२/२०२५	सावित्रीबााई फुले पुणे विद्यापीठ, पुणे येथे राज्यस्तरीय उत्कर्ष - सामाजिक व सांस्कृतिक महोत्सव संपन्न झाला ज्यामध्ये ०९ मुले आणि ०९ मुलींनी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे प्रतिनिधित्व केले. • श्री. ऋषिकेश राऊत विनायक विद्यामंदिर, अमरावती. • श्री. मानस एलगुंडे ब्रिजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती. • श्री. प्रथमेश चौधरी आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे. • श्री. तन्मय जगताप कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, अकोला. • श्री. यश कांबळे कॉलेज ऑफ मॅनेजमेंट ॲन्ड कॉम्प्युटर सायन्स, यवतमाळ. • श्री. शुभम ढेडांडे जवाहरलाल दर्डा इन्स्टीटयुट ऑफ इंजिनिअरीग, यवतमाळ. • श्री. रीतेश वाणी भगवान बाबा कला आणि वाणिज्य महाविद्यालय, लोणार.

१	२	३	४
			• श्री. अनिकेत राठोड नेहरु महाविद्यालय, नेरपरसोपंत. • श्री. संम्यक तेलमोरे वाय.डी.व्ही.डी. कला, वाणिज्य महाविद्यालय, तिवसा. • कु. सुहानी पाटील आदर्श महाविद्यालय, धामणगाव रेल्वे. • कु. कांचन वानखडे जे. डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालय, दर्यापुर. • कु. समृद्धी मुळे वाय.डी.व्ही.डी. कला, वाणिज्य महाविद्यालय, तिवसा. • कु. दिशा कवळे श्री आर.एल.टी. कॉलेज ऑफ सायन्स, अकोला • कु. साक्षी महल्ले जगदंब कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, यवतमाळ • कु. प्रेरणा देशमुख जी. एस. विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांव • कु. रिया केदार प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा • कु. साक्षी गिरी श्री. रामराव सरनाईक समाजकार्य महा., वाशिम • कु. भावना उपाध्ये एस.एस.एस.के.आर. इन्नानी महाविद्यालय, कारंजा लाड या महोत्सवात संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाने खालील पारितोषिके मिळवली. • सर्वोत्कृष्ट शिस्तप्रिय संघ म्हणून निवड • तृतीय पारितोषिक - कार्यप्रसिद्धी अहवाल स्पर्धेत फिरता करंडक
१८.	**राज्यस्तरीय प्रेरणा - नेतृत्व आणि व्यक्तिमत्व विकास शिबिर** (पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ)	१७/०३/२०२५ ते २१/०३/२०२५	पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापुर विद्यापीठाने आयोजित केलेल्या राज्यस्तरीय प्रेरणा - नेतृत्व आणि व्यक्तिमत्व विकास शिबिरामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठा अंतर्गत महाविद्यालयातील ०५ मुले आणि ०५ मुली व महिला रासेयो कार्यक्रम अधिकारी यांनी सहभाग घेतला आणि सर्वाधिक बक्षिसे मिळविली.

१	२	३	४
			• श्री. जय उकरडे जे. डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालय, दर्यापूर • श्री. तन्मय देव श्रीमती एल. आर. टी. वाणिज्य महाविद्यालय, अकोला • श्री. समर्थ पाठक भारतीय महाविद्यालय, अमरावती • श्री. गौरव ऐसकर बाबासाहेब नाईक अभियांत्रिकी महाविद्यालय, पुसद • श्री. प्रणव डोंगरदिवे राजर्षी शाहु कॉलेज ऑफ फार्मसी, माळविहिर, बुलडाणा • कु. आशु भुजबळ श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती • कु. पुनम पखाली सरस्वती कला महाविद्यालय, दहिहांडा • कु. दिपाली ठाकरे बाबाजी दाते कला, वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ • कु. मानसी आसटकर विज्ञान महाविद्यालय, मलकापूर • कु. श्रेया गायगोले जे.डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालय, दर्यापूर या शिबिरामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला खालील पारितोषिके मिळाली. • संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाला उत्कृष्ट विद्यापीठ पुरस्कार • डॉ. अनिता धुर्वे यांना उत्कृष्ट कार्यक्रम अधिकारी पुरस्कार • कु. दिपाली ठाकरे हिला उत्कृष्ट कविता वाचन व उत्कृष्ट सहभाग पुरस्कार
	राष्ट्रीय स्तरीय कार्यक्रम		
१९.	**माय भारत पोर्टल प्रशिक्षण कार्यक्रम नागपूर**	१९/०७/२०२४	माय भारत पोर्टल प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन व्ही. एन. आय. टी., नागपुर येथे रासेयो कार्यक्रम अधिकारी यांचेकरिता करण्यात आले होते. सदर प्रशिक्षण कार्यक्रमामध्ये अमरावती, अकोला, यवतमाळ, बुलडाणा व वाशिम जिल्ह्यातून प्रत्येकी ०४ असे एकूण २० कार्यक्रम अधिकारी सहभागी झाले व त्यांना माय भारत पोर्टलचे प्रशिक्षण देण्यात आले.
२०.	**स्वातंत्र्यदिन सोहळा पाहण्यासाठी विशेष अतिथी**	१५/०८/२०२४	दि. १५/०८/२०२४ रोजी लाल किल्ला नवी दिल्ली येथे स्वातंत्र दिन सोहळा पाहण्यासाठी युवा व खेल मंत्रालय

१	२	३	४
	म्हणून स्वयंसेवकांचा सहभाग (लाल किल्ला, नवी दिल्ली)		भारत सरकार यांचे वतीने माय भारत या पोर्टलवर ज्या रासेयो स्वयंसेवकांचा उत्कृष्ट प्रतिसाद व कार्य असणा-या ०२ स्वयंसेवकांना विशेष अतिथी म्हणून निमंत्रित करण्यात आले. सदर सोहळ्यामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठा अंतर्गत कु. प्राप्ती प्रमोद उगले, प्रो. राम मेघे कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड मॅनेजमेंट, बडनेरा रेल्वे, अमरावती व श्री शंतनु भिकाजी संगुनवेढे, श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोट हे रासेयो स्वयंसेवक सहभागी झाले.
२१.	**राष्ट्रीय साहसी शिबिर धरमशाला, हिमाचल प्रदेश**	२७/११/२०२४ ते ०६/१२/२०२४	संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे ०२ मुले आणि ०२ मुली स्वयंसेवकांनी राष्ट्रीय साहसी शिबिर, अटलबिहारी वाजपेयी इन्स्टिट्यूट ऑफ माउंटेनियरिंग अँड अलाईड स्पोर्ट, धरमशाला, हिमाचल प्रदेश येथे प्रतिनिधित्व केले. • श्री. जय उकरडे जे. डी. पाटील सांगळुदकर महाविद्यालय, दर्यापुर • कु. उर्मिला काळे श्री शिवाजी विज्ञान आणि कला महाविद्यालय, चिखली • कु. आचल अे. आडे सावित्री ज्योतीराव समाजकार्य महाविद्यालय, यवतमाळ • श्री. युवराज जी. कदम श्रीमती शकुंतलाबाई धाबेकर महाविद्यालय, कारंजा लाड • श्री. मंगेश जी. खोडे श्री शिवाजी कला व वाणिज्य महाविद्यालय, अमरावती
२२.	**प्रजासत्ताक दिन परेड, नवी दिल्ली**	२६/०१/२०२५ ते	स्वामी रामानंद तिर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड येथ आयोजित पूर्व गणतंत्र दिन पथसंचलन निवड चाचणी शिबिर व कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव येथे आयोजित वेस्ट झोन आर. डी. परेड कॅम्प मधून निवड करण्यात आलेल्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठा अंतर्गत श्री. रा.ल.तो. विज्ञान महाविद्यालय, अकोला येथील कु. लिना विठ्ठल अवथळे हिने २६ जानेवारी, २०२५ रोजी दिल्ली येथे होणा-या प्रजासत्ताक दिन परेड (एन.आर.डी.परेड) करिता राष्ट्रीय संघात सहभाग घेतला.

१	२	३	४

इतर कार्यक्रम

२३. रक्तदान शिबिर — २०२४-२५

पाच जिल्ह्यांमध्ये विविध महाविद्यालयांनी २१५ रक्तदान शिबिरे आयोजित केली होती आणि सुमारे १९,५५० बाटल्या रक्त गोळा केले होते.

अ. क्र.	जिल्हा	रक्त गोळा(बॉटल)
१.	अमरावती	५८००
२.	अकोला	२९००
३.	बुलडाणा	४२००
४.	यवतमाळ	४३००
५.	वाशिम	२३५०
	एकूण	**१९,५५०**

२४. **वृक्षारोपण कार्यक्रम आणि संवर्धन** — २०२४-२५

महाराष्ट्र शासनाच्या वृक्षारोपण मोहिमेअंतर्गत पुढाकार घेण्यात आला असून पाच जिल्ह्यांमध्ये ९५,५०० झाडे लावण्यात आली आहेत.

अ. क्र.	जिल्हा	वृक्षारोपण
१.	अमरावती	२६५००
२.	अकोला	१६०००
३.	बुलडाणा	१९०००
४.	यवतमाळ	१९५००
५.	वाशिम	१४५००
	एकूण	**९५५००**

२५. **एक पेड माँ के नाम वृक्षारोपण कार्यक्रम** — ०५/०७/२०२४ ते ३०/०७/२०२४

रासेयो युनिट असलेल्या संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयांनी दि. ०५/०७/२०२४ ते ३०/०७/२०२४ या कालावधीत एक पेड माँ के नाम - वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन केले. सदर मोहिमे अंतर्गत पाचही जिल्ह्यामध्ये एकूण ९५,५०० वृक्ष लागवड करण्यात आली.

२६ **क्रांतीदिन** — ०९/०८/२०२४

दि. ०९/०८/२०२४ रोजी संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित असलेल्या सर्व महाविद्यालयांमध्ये क्रांती दिन साजरा करण्यात आला.

२७. **हर घर तिरंगा उपक्रम वृक्षारोपण कार्यक्रम** — ०९/०८/२०२४ ते १५/०८/२०२४

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित रासेयो युनिट असलेल्या सर्व महाविद्यालयांनी दि. ०९/०८/२०२४ ते १५/०८/२०२४ या कालवधीत हर घर तिरंगा उपक्रम राबविला.

२८. **राष्ट्रीय पोषण माह** — ०१/०९/२०२४ ते

दि. ०१ ते ३० सप्टेंबर, २०२४ या कालावधीमध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय

१	२	३	४
		३०/०९/२०२४	पोषण माह साजरा करण्यात आला असून त्यामध्ये रक्तदान आणि आरोग्य तपासणी शिबिरे, मुलांची उंची आणि वजन मोजणे व तंदुरुस्त आरोग्याबाबत मार्गदर्शनपर सत्र आयोजित करणे, पुरक आहार व त्याविषयी जनजागृती सत्रे, चर्चा सत्रे ई. विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.
२९.	**स्वच्छता ही सेवा उपक्रम**	१७/०९/२०२४ ते ०२/१०/२०२४	संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित रासेयो युनिट असलेल्या सर्व महाविद्यालयांनी दि. १७/०९/२०२४ ते ०२/१०/२०२४ या कालवधीत स्वच्छता ही सेवा (स्वभाव स्वच्छता, संस्कार स्वच्छता) या शिर्षाअंतर्गत कार्यक्रम राबविला. सदर कालावधीमध्ये सफाई मित्र, सुरक्षा शिबिर या उपक्रमाद्वारे रेल्वे स्थानक, बस स्थानक इ. स्वच्छ करण्यात आले. स्वच्छतेबाबत स्वच्छता रॅली, प्लॉस्टीक निर्मुलन रॅली, स्वच्छता पथनाट्याचे आयोजन, प्लॉस्टीक कचरा कलेक्शन, स्वच्छता स्पर्धा, स्वच्छ घर सुंदर घर स्पर्धा ई. उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.
३०.	**स्वच्छता ही सेवा उपक्रम**	२४/०९/२०२४	संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नीत रासेयो युनिट असलेल्या सर्व महाविद्यालयांनी दिनांक २४/०९/ २०२४ हा दिवस रासेयो स्थापना दिवस म्हणून साजरा करण्यात आला.
३१.	**राष्ट्रीय एकता दिवस**	३१/१०/२०२४	संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित रासेयो युनिट असलेल्या सर्व महाविद्यालयांनी सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंती निमित्त ३१ ऑक्टोंबर, २०२४ हा दिवस राष्ट्रीय एकता दिवस म्हणून साजरा करण्यात आला. त्यामध्ये एकता दौड, एकात्मतेची शपथ या उपक्रमांचे आयोजन करण्यात आले.
३२.	**संविधान दिन**	२६/११/२०२४	संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयामध्ये दि. २६ नोव्हेंबर, २०२४ रोजी संविधान दिन साजरा करण्यात आला असून त्यामध्ये महाविद्यालय परिसरात संविधान जनजागृती रॅलीने आयोजन करण्यात आले तसेच भारतीय संविधान उद्देशिका वाचन व शपथ कार्यक्रम आयोजित करण्यात आले.
३३.	**संत गाडगे बाबा पुण्यतिथी**	२०/१२/२०२४	संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयामध्ये दि. २०/१२/२०२४ रोजी संत गाडगे बाबा पुण्यतिथी साजरी करण्यात आली. या निमित्ताने वैराग्यमूर्ती संत गाडगे बाबा यांच्या दशसूत्रीवर आधारित कार्यक्रम महाविद्यालयामध्ये राबविण्यात आले.

१	२	३	४
३४.	**स्थानिक सामुदायिक स्थळे दत्तक उपक्रम**	२०२४-२०२५	संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयांमध्ये राष्ट्रीय सेवा योजना अंतर्गत स्थानिक समुदायिक स्थळे दत्तक उपक्रमा अंतर्गत रासेयो पथकाद्वारे महाविद्यालयाजवळ असणारे उद्याने, क्रीडांगणे, शाळा, ऐतिहासिक वास्तू, रुग्णालये, सार्वजनिक जागा, पटांगणे, सार्वजनिक वाचनालय इत्यादी सारख्या स्थानिक समुदाय मालमत्ता दत्तक घेऊन ते ठिकाण ज्यांच्या अधिपत्याखाली येते त्यांची परवानगी घेऊन त्या ठिकाणी स्वच्छता, वृक्षारोपण, वृक्षांची देखभाल, कचरा निर्मूलन, बसण्याची व्यवस्था, पाणी व्यवस्थापन इत्यादींची सौदर्यीकरण तसेच छोटया-छोटया सुधारणा दुरुस्ती करून त्यांचे जतन करण्याचे कार्य करण्यात आले.
३५.	**डॉ. पंजाबराव देशमुख जयंती कार्यक्रम** (१२६ वी)	२७/१२/२०२४	डॉ. पंजाबराव देशमुख यांच्या १२६ व्या जयंती निमित्त, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावतीशी संलग्नित महाविद्यालयांच्या रासेयो पथकाद्वारा व्याख्यान, चर्चासत्र, वकृत्व स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, शेतकरी कार्यशाळा, रक्तदान शिबिर, प्रदर्शनी, रॅली, पथनाटय इत्यादी विविध कार्यक्रमांचे आयोजन करून आदरांजली वाहण्यात आली.
३६.	**रस्ता सुरक्षा अभियान जनजागृती कार्यक्रम**	०१/०१/२०२५ ते ३१/०१/२०२५	रस्ता सुरक्षा अभियानामध्ये महाविद्यालयातील रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग घेतला आणि पोलीस विभागाच्या सहकार्याने विविध जनजागृती सुरक्षा कार्यक्रम राबविण्यात आले असून 'सडक सुरक्षा जीवन रक्षा' हा संदेश वाढविण्यासाठी कार्यवाही करण्यात आली.
३७.	**जय शिवाजी जय भारत**	१४/०२/२०२५ ते १८/०२/२०२५	दि. १९/०२/२०२५ रोजी छत्रपती शिवाजी महाराज जयंती निमित्त संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयांमध्ये विद्यार्थी/ स्वयंसवेकांनी 'जय शिवाजी जय भारत' मेगा पदयात्रेचे आयोजन करण्यात आले. तसेच दिनांक १४ ते १८ फेब्रुवारी, २०२५ या कालावधीमध्ये माय भारत नोंदणी अभियान, आरोग्य आणि एकतेला प्रोत्साहन देणारी योगसत्रे, श्रमदान आणि स्वच्छता विशेषतः छत्रपती शिवाजी महाराजांचा दर्जा आणि परिसर, शिवाजी महाराजांच्या जीवनाचा इतिहास, वैद्यकीय आणि जागरुकता शिबिरे यावर अतिथींचे व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले.
३८.	**संविधान गौरव महोत्सव**	फेब्रुवारी, २०२५	भारतीय राज्यघटनेचा मसुदा स्वीकारण्याला दिनांक २६ नोंव्हेंबर, २०२४ रोजी एक सार्वभौम, लोकशाही प्रजासत्ताक स्थापन करण्याला ७५ वर्ष पूर्ण झालेले आहे. भारताच्या ऐतिहासिक परिवर्तनात्मक क्षणाचा सन्मान करण्यासाठी

१	२	३	४
			माहे फेब्रुवारी, २०२५ मध्ये संपूर्ण महिनाभर संविधान गौरव महोत्सवाच्या अनुषंगाने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयांमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
३९.	**बेटी बचाव बेटी पढाओ उपक्रम**	२२/०१/२०२५ ते ०८/०३/२०२५	'बेटी बचाव बेटी पढाओ' या उपक्रमाला दिनांक २२ जानेवारी, २०२५ रोजी १० वर्ष पूर्ण झाल्यामुळे संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयांमध्ये दि. २२/०१/२०२५ ते ०८/०३/२०२५ या कालावधीमध्ये विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
४०.	**संत गाडगे बाबा जयंती**	२३/०२/२०२५	दि. २३/०२/२०२५ रोजी संत गाडगे बाबा यांच्या जयती दिनानिमित्त महाविद्यालयात दशसूत्रीवर आधारित वकृत्व स्पर्धा, चर्चासत्र, निबंध स्पर्धा, उद्‌बोधन दशसूत्रीवर आधारित पथनाटय, एकपात्री प्रयोग, स्वच्छतेच्या दृष्टीने 'स्वच्छ भारत व स्वस्थ भारत' इ. सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.
४१.	**स्वातंत्र्यविर वि.दा. सावरकर पुण्यतिथी**	२५/०२/२०२५	संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयामध्ये दि. २५/०२/२०२५ रोजी स्वातंत्रवीर वि. दा. सावरकर यांच्या पुण्यतिथी निमित्त रक्तदान शिबिर व मरणोत्तर नेत्रदान जनजागृती शिबिर आयोजित करण्यात आले.
४२.	**डिजीटल कृषी विषयक अनुभवात्मक शिक्षण कार्यक्रम**	०५/०३/२०२५	डिजिटल कृषी विषयक अनुभवात्मक शिक्षण कार्यक्रम सुरू केलेला आहे. सदर कार्यक्रमात रासेयो स्वयंसेवकांनी डिजिटल पीक सर्वेक्षण आणि शेतक-यांच्या ई-केवायसी प्रक्रियेत जास्तीत जास्त सहभाग घेऊन ईएलपी चा प्रचार व प्रसार केलेला आहे. 'माय भारत आउटरीच प्रोग्राम' करिता विद्यार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. रासेयो स्वयंसेवकांची 'माय भारत युथ ॲम्बेसेडर' म्हणून निवड करून त्यांच्या मार्फत सदर उपक्रमासाठी 'डिजिटल कृषी विषयक अनुभवात्मक शिक्षण कार्यक्रम' बाबतची नोंदणी अभियान राबविण्यात आले.
४३.	**आंतरराष्ट्रीय जागतिक महिला दिन**	०८/०३/२०२५	संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयांमध्ये दि. ०८/०३/२०२५ रोजी आंतर राष्ट्रीय जागतिक महिला दिना निमित्त महिलांना शारीरिक तंदुरुस्ती, मानसिक आरोग्य, निरोगी पोषण आणि सामाजिक समावेशनाला प्रोत्साहन देण्यासाठी प्रयत्न करण्यात आले व महिला सक्षम करण्यासाठी पथनाट्य, रॅली, जनजागृतीपर कार्यक्रम इ. चे आयोजन करण्यात आले.

१	२	३	४
४४.	**शहीद दिन**	२५/०३/२०२५	राष्ट्रीय सेवा योजना व विद्यार्थी विकास विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २५/०३/२०२५ रोजी शहीद दिनाच्या अनुषंगाने डॉ. श्रीकांत जिचकार मेमोरिअल रिसर्च सेंटर, येथे डॉ. मिलिंद बारहाते, मा. कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांच्या अध्यक्षतेखाली शहीद दिनाच्या निमित्ताने व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाकरिता विद्यापीठातील विभाग प्रमुख, अधिकारी, कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.
४५.	**समता दौड** (पंचवटी ते इर्विन)	१२/०४/२०२५	समता दिवसा निमित्त दि. १२/०४/२०२५ रोजी पंचवटी ते इर्विन चौकापर्यंत 'समता दौड' चे आयोजन करण्यात आले. समता दौड मध्ये सुमारे १२०० रासेयो स्वयंसेवक सहभागी झाले होते.
४६.	**समता व संविधान जनजागृती रॅली**	१४/०४/२०२५	दि. १४/०४/२०२५ रोजी विद्यापीठ परिसर ते इर्विन चौका दरम्यान समता व संविधान जनजागृती रॅली काढण्यात आली.
४७.	**डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती**	१५/०४/२०२६	संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयांमध्ये डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती दि. १४/०४/२०२५ रोजी साजरी करण्यात आली. सदर कार्यक्रमामध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याजवळ/प्रमुख स्मारका जवळ पदयात्रेचे आयोजन करणे, संविधान उद्देशिकेचे वाचन कार्यक्रम आयोजित करणे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जीवनावर प्रश्नमंजुषा, चर्चा सत्र आणि जागरुकता सत्राचे आयोजन करण्यात आले.
४८.	**एक पेड माँ के नाम २.०**	०५/०६/२०२५ ते ३०/०६/२०२५	जागतिक पर्यावरण दिनानिमित्त विद्यापीठा अंतर्गत महाविद्यालयांमध्ये दिनांक ०५ जून ते ३० जून, २०२५ या कालावधीमध्ये एक पेड माँ के नाम २.० ही मोहीम राबविण्यात आली.
४९.	**वृक्ष लागवड अभियान**	१०/०६/२०२५ ते ३०/०६/२०२५	जागतिक पर्यावरण दिनाच्या निमित्ताने राज्यात १० कोटी वृक्ष लागवड करणेबाबत केलेल्या आवाहनानुसार विद्यापीठा अंतर्गत महाविद्यालय परिसरात तसेच शहरात व गावात अन्य ठिकाणी महाविद्यालयीन कार्यक्रम अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली रासेयो स्वयंसेवकांमार्फत वृक्षलागवड मोहीम राबविण्यास सुरुवात करण्यात आली.
५०.	**आंतरराष्ट्रीय योग दिन**	२१/०६/२०२५	संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ अंतर्गत महाविद्यालयांमध्ये दि. २१ जून, २०२५ रोजी आंतर राष्ट्रीय योग दिन साजरा करण्यात आला.

१	२	३	४
५१.	**दत्तक गाव विशेष श्रमसंस्कार शिबीर** (७ दिवसीय)	जानेवारी ते मार्च २०२५	०७ दिवसांच्या निवासी विशेष शिबिरांचे आयोजन १८९ महाविद्यालयांनी केले होते आणि त्यात १२०२५ रासेयो स्वयंसेवकांनी सहभाग नोंदविला. श्रमदान, वृक्षारोपण, स्वच्छता, विविध जनजागृती कार्यक्रम, सांस्कृतिक कार्यक्रम, बंधारे निर्मिती, शेततळे निर्मिती, शोष खड्डे निर्मिती आणि बौध्दीक सत्रामध्ये विविध वक्त्यांनी केलेल्या सामाजिक व शैक्षणिक मार्गदर्शनामुळे शिबिरे यशस्वी झाली.

*****

३) विद्यार्थी विकास विभाग

०१. वादविवाद स्पर्धा :

दिनांक १० ऑक्टोबर, २०२४ रोजी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ येथे आंतर विद्यापीठ मराठी वक्तृत्व स्पर्धेमध्ये सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, बडनेरा रोड, अमरावती येथील कु.श्रावणी श्रीकांत रोटे या विद्यार्थिनीने सहभागी होऊन प्रथम स्थान प्राप्त केले.

तसेच दिनांक १५ ऑक्टोबर, २०२४ रोजी मुंबई विद्यापीठ, मुंबई येथे माजी कुलपती डॉ. पी. सी. अलेक्झांडर इंग्रजी वक्तृत्व स्पर्धेमध्ये राजस्थान आर्यन कला, श्री मिठूलालजी कचोलिया वाणिज्य आणि श्री सत्यनायणजी, रामकृष्णजी राठी विज्ञान महाविद्यालय, वाशिम येथील विद्यार्थिनी कु.राधिका दीपक दंडे ही विद्यार्थिनी तर चमु व्यवस्थापक म्हणून प्रा.जागृती व्यास, श्रीमती केशरबाई लाहोटी महाविद्यालय, अमरावती यांनी सहभाग घेतला.

दि. २२ व २३ जानेवारी, २०२५ या कालावधीत शिक्षा मंडळ वर्धा तर्फे ४९ वा कमलनयन बजाज स्मृति राष्ट्रीय वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन शिक्षा मंडळ, वर्धा येथे करण्यात आले आहे. सदर स्पर्धेत सिपना कॉलेज ऑफ इंजिनिअरींग ॲन्ड टेक्नॉलॉजी, बडनेरा रोड, अमरावती येथील कु.श्रावणी श्रीकांत रोटे ही विद्यार्थीनी काही अपरिहार्य कारणामुळे सहभागी होऊ शकली नाही.

०२. विद्यार्थी सुरक्षा विमा योजना :

सन २०२४-२०२५ या सत्राकरीता संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित ४२६ महाविद्यालये व ३५ पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील एकूण **१,५४,७८७** विद्यार्थ्यांचा विद्यार्थी सुरक्षा विमा नॅशनल इन्शुरन्स कंपनी, देवरणकर नगर, बडनेरा रोड, राजापेठ, अमरावती यांचेकडून करारनामा करण्यात येऊन दिनांक ०४.११.२०२४ ते ०३.११.२०२५ या कालावधीकरिता विमा काढण्यात आला. याकरीता विमा कंपनीस १,५४,७८७ एवढ्या विद्यार्थ्यांचा प्रती विद्यार्थी रु.१०/- या दराने एकूण रक्कम रुपये **१५,४७,८७०/- (अक्षरी रुपये पंधरा हजार सत्तेचाळीस हजार आठशे सत्तर फक्त)** एवढ्या रकमेचे शोधन धनादेश क्र. १२०७६६ दिनांक ०४.११.२०२४ नुसार करण्यात आले आहे.

03. Financial Aid to Students :

अ) विद्यार्थी कल्याण निधी शिष्यवृत्ती :

सत्र २०२४-२०२५ मध्ये विद्यार्थी विकास निधीमधून एकूण १३८ विद्यार्थ्यांना रुपये २,१७,०००/- एवढ्या शिष्यवृत्तीचे शोधन करण्यात आले.

शिष्यवृत्तीचा तपशील

अ.क्र.	विद्याशाखा	सत्र २०२३-२०२४ मधील विद्यापीठात प्रवेशित संख्या	स्नातक						
			विनियमानुसार एकूण देय शिष्यवृत्तीचा तपशिल			प्राप्त आवेदनपत्रानुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येचा तपशिल			
			देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीची संख्या	नुतनीकरण संख्या	एकूण (४-५)	एकूण प्राप्त अर्जाची संख्या	निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या	नुतनीकरण	एकूण
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
०१.	वाङ्मय व समाजविज्ञान	४४,७२२	३७	०६	३१	८९	३२	०५	३७
०२.	वाणिज्य	२४,३११	२०	०१	१९	९४	१९	०१	२०
०३.	विज्ञान	३१,९३९	२७	०१	२६	५८	२६	०१	२७
०४.	गृहविज्ञान	----	---	---	---	---	---	---	---
०५.	शिक्षण	४,६२९	०४	---	०४	---	---	---	---
०६.	विधी	३,५०६	०३	---	०३	---	---	---	---
०७.	वैद्यक	८,०५५	०७	---	०७	०२	०२	---	०२
०८.	अभियांत्रिकी	२०,८८७	१७	---	१७	११	११	---	११
	एकूण	**१,३८,०४९**	**११५**	**०८**	**१०७**	**२५४**	**९०**	**०७**	**९७**

अ.क्र.	विद्याशाखा	सत्र २०२३-२०२४ मधील विद्यापीठात प्रवेशित संख्या	स्नातकोत्तर						
			विनियमानुसार एकूण देय शिष्यवृत्तीचा तपशिल			प्राप्त आवेदनपत्रानुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येचा तपशिल			
			देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीची संख्या	नुतनीकरण संख्या	एकूण (४-५)	एकूण प्राप्त अर्जाची संख्या	निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या	नुतनीकरण	एकूण (८+९)
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
०१.	वाङ्मय व समाजविज्ञान	८९९४	३६	०३	३३	१५	११	०३	१४
०२.	वाणिज्य	५०९६	२०	०१	१९	०६	०३	---	०३
०३.	विज्ञान	८५७	०३	---	०३	१४	०३	---	०३
०४.	गृहविज्ञान	१३९	०१	---	०१	---	---	---	---
०५.	शिक्षण	६३	०१	---	०१	---	---	---	---
०६.	विधी	५७९	०२	---	०३	---	---	---	---
०७.	वैद्यक	७२५	०२	---	०३	---	---	---	---
०८.	अभियांत्रिकी	२८५	०१	---	०७	---	---	---	---
	एकूण	१६,७३८	**६६**	**०४**	**७०**	**३५**	**१७**	**०३**	**२०**

इतर शिष्यवृत्ती

अ.क्र.	उपक्रम	विनियमानुसार एकूण देय शिष्यवृत्तीचा तपशिल		प्राप्त आवेदनपत्रानुसार निवड झालेल्या विद्यार्थ्यांच्या संख्येचा तपशिल		
		देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीची संख्या	एकूण	एकूण प्राप्त अर्जाची संख्या	निवड करण्यात आलेल्या विद्यार्थ्यांची संख्या	एकूण
१	२	३	४	४	६	७
०१.	**एन.सी.सी.**	०६	०६	०५	०५	०५
०२.	**एन.एस.एस.**	०८	०८	१६	०८	०८
०३.	**क्रिडा**	०८	०८	०१	०१	०१
०४.	**सांस्कृतिक कार्यक्रम**	०८	०८	०८	०७	०७
	एकूण	**३०**	**३०**	**३०**	**२१**	**२१**

ब) स्व.प्रा.रामप्रकाश शामलाल राठी स्मृती शिष्यवृत्ती :

प्रा.रामप्रकाश शामलाल राठी स्मृती शिष्यवृत्तीकरिता विनिमयानुसार एकूण ०५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वाटप करावी लागते. सत्र २०२४ - २०२५ मध्ये पात्र असलेल्या खालील एकूण ०५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली असून सदर विद्यार्थ्यांना प्रत्येकी रु.१५००/- प्रमाणे एकूण रु.७,५००/- एवढी शिष्यवृत्ती प्रदान करण्यात आली.

अ.क्र.	**विद्यार्थ्यांचे नांव**	**महाविद्यालयाचे नांव**	**रक्कम**
०१.	कु. कोमल श्रीकृष्ण वार	श्री वसंतराव नाईक कला व अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरुळपीर, जि.वाशिम	१५००/-
०२.	कु. जयश्री देवेंद्र मोकळकर	शंकरलाल खंडेलवाल कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला	१५००/-
०३.	कु. वैष्णवी भिमराव राऊत	मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा, जि.यवतमाळ	१५००/-
०४.	अनिकेत सिद्धार्थ सहस्त्रबुद्धे	श्री शिवाजी कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला	१५००/-
०५.	कु. ज्ञानेश्वरी उमेश इंगोले	मुंगसाजी महाराज महाविद्यालय, दारव्हा, जि.यवतमाळ	१५००/-
		एकूण रुपये	**७५००/-**

क) संत गाडगे बाबा 'विद्याधन योजना' :

संत गाडगे बाबा विद्याधन योजनेअंतर्गत एकूण १२ पात्र विद्यार्थ्यांना त्यांच्या शैक्षणिक व्याजाचे एकूण रुपये १,४५,५२४/- (अक्षरी रु. एक लक्ष पंचेचाळीस हजार पाचशे चोवीस फक्त) एवढ्या राशीचे शोधन करण्यात आलेले आहे.

ड) संत गाडगे बाबा 'कमवा व शिका योजना' :

सत्र २०२४-२०२५ करिता संत गाडगे बाबा कमवा आणि शिका योजनेअंतर्गत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित खालीलप्रमाणे महाविद्यालयातील व पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली.

अ.क्र.	जिल्हा/विभाग	महाविद्यालय/विभाग संख्या	विद्यार्थी संख्या
०१.	पदव्युत्तर शैक्षणिक विभाग	१४	४२
०२.	अमरावती जिल्हा	२१	५७
०३.	अकोला जिल्हा	०५	१६
०४.	बुलडाणा जिल्हा	०४	१३
०५.	यवतमाळ जिल्हा	०७	२२
०६.	वाशिम जिल्हा	०९	२२
	एकूण	**६०**	**१७२**

यामध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील एकूण ४६ महाविद्यालयातील ६१ विद्यार्थी तर विद्यापीठाचे एकूण १४ शैक्षणिक विभागातील २७ विद्यार्थी असे एकूण ८८ विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे. तसेच या योजनेंतर्गत केंद्रीय प्रवेश समिती अंतर्गत एकूण ०६ विद्यार्थ्यांनी तर कोव्हीड-१९ मॉलिफ्युलर डायग्नोस्टिक लॅब येथे ०१ विद्यार्थिनीने या योजनेचा लाभ घेतलेला आहे.

इ) संत गाडगे बाबा 'विद्यार्थिनी बस पास सवलत योजना' :

सत्र २०२४-२०२५ करीता संत गाडगे बाबा विद्यार्थीनी बस पास सवलत योजनेंतर्गत संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित खालीलप्रमाणे महाविद्यालयातील व पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील विद्यार्थीनींची निवड करण्यात आली होती.

अ.क्र.	जिल्हा/विभाग	महाविद्यालय/विभाग संख्या	विद्यार्थिनी संख्या	प्रतिक्षार्थी विद्यार्थिनी संख्या
०१.	पदव्युत्तर शैक्षणिक विभाग	०१	०१	—
०२.	अमरावती जिल्हा	१८	४८	०३
०३.	अकोला जिल्हा	०५	१४	—
०४.	बुलडाणा जिल्हा	०८	२४	०१
०५.	यवतमाळ जिल्हा	०४	११	०१
०६.	वाशिम जिल्हा	०५	१३	०१
	एकूण	**४१**	**१११**	**०६**

यामध्ये विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील अमरावती जिल्ह्यातील ०३ महाविद्यालयांतील ०७ विद्यार्थिनी, यवतमाळ जिल्ह्यातील ०१ महाविद्यालयातील ०४ विद्यार्थिनींनी असे एकूण ११ विद्यार्थिनींनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे.

फ) संत गाडगे बाबा 'शुद्ध पेयजल योजना' :

सत्र २०२४-२०२५ मध्ये संत गाडगे बाबा शुद्ध पेयजल योजनेअंतर्गत खालील एकूण ०५ महाविद्यालयांची निवड करण्यात आली होती.

अ.क्र.	महाविद्यालयाचे नांव
०१.	श्री धाबेकर कला महाविद्यालय, खडकी, अकोला
०२.	एल.एन.कला महाविद्यालय, वाडेगांव, जि.अकोला
०३.	रामराव झनक कला-वाणिज्य महाविद्यालय, मालेगांव, जि. वाशिम
०४.	राजमाता जिजाऊ महिला महाविद्यालय, नेर, जि.यवतमाळ
०५.	उत्कर्ष कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, सिंदखेडराजा

ग) संत गाडगे बाबा 'विद्यार्थी शिक्षण संरक्षण योजना' :

सत्र २०२४-२०२५ मध्ये संत गाडगे बाबा शिक्षण संरक्षण योजनेअंतर्गत एकूण ४५ विद्यार्थ्यांची निवड करण्यात आली होती. परंतु यामध्ये ०१ विद्यार्थिनीने प्रवेश रद्द केल्यामुळे तसेच ०१ विद्यार्थिनीचा प्रवेश नसल्यामुळे व ३३ विद्यार्थी इतर शिष्यवृत्तीचा लाभ घेत असल्यामुळे नियमानुसार अपात्र ठरलेले आहे. त्यामुळे सत्र २०२४-२०२५ मध्ये एकूण १० विद्यार्थ्यांनी या योजनेचा लाभ घेतलेला आहे.

ह) कौशल्य विकास योजना :

सत्र २०२४-२०२५ मध्ये विनियम क्रं.१२/२०१९ नुसार संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयातील विद्यार्थ्यांकरिता कौशल्य विकास योजना सुरू करण्यात आलेली असून सदर योजना ही संलग्नित महाविद्यालयामध्ये मा.कुलगुरू महोदयांनी दिलेल्या आदेशानुसार प्रथम सत्राकरिता **दिनांक १८ नोव्हेंबर, २०२४ ते दिनांक १७ डिसेंबर, २०२४** या कालावधीमध्ये आयोजित करण्यात आल्यात. यामध्ये **अमरावती जिल्हा- ०६, अकोला जिल्हा - ०३, बुलडाणा जिल्हा - ०८, यवतमाळ जिल्हा - ०९ व वाशिम जिल्हा - ०४ असे एकूण ३०** महाविद्यालयांनी या योजनेअंतर्गत कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेत एकूण ११४० विद्यार्थी सहभागी झाले होते.

तसेच द्वितीय सत्राकरिता **दिनांक २० जानेवारी, २०२५ ते दिनांक १९ फेब्रुवारी, २०२५** या कालावधीत आयोजित करण्यात आल्यात. यामध्ये **विद्यापीठ पदव्युत्तर शैक्षणिक विभाग - ०१, अमरावती जिल्हा - ०६, अकोला जिल्हा - ०४ , बुलडाणा जिल्हा - ०५, यवतमाळ जिल्हा - ०२ व वाशिम जिल्हा - ०१ असे एकूण १९** महाविद्यालयांनी या योजनेअंतर्गत कार्यशाळेचे आयोजन केले. या कार्यशाळेत एकूण ९५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

***

विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे कार्यक्रम :

विद्यापीठ विद्यार्थी परिषद व विद्यापीठ शैक्षणिक विभाग विद्यार्थी परिषद यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेले उपक्रम :

सत्र २०२४-२०२५ करिता शासनाकडून विद्यापीठ विद्यार्थी परिषद गठन करण्यासंदर्भात कोणत्याही प्रकारचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे सत्र २०२४-२०२५ मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे गठन करण्यात आले नाही. त्यामुळे विद्यापीठ विद्यार्थी परिषदेद्वारे कोणत्याही प्रकारचे कार्यक्रम आयोजित करण्यात आलेले नाहीत.

४) विद्यापीठ विद्यार्थी परिषद निवड :

सत्र २०२४-२०२५ करिता शासनाकडून कोणत्याही प्रकारचे आदेश प्राप्त न झाल्यामुळे सत्र २०२४-२५ मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ विद्यार्थी परिषदेचे गठन करण्यात आले नाही.

५) इतर माहिती :

अ) महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम-२०१६ सन २०१९ चा एकरुप परिनियम क्र.५ नुसार ५, तक्रार निवारण कक्षाअंतर्गत (४) विद्यापीठ तक्रार निवारण कक्षाकरिता गठीत समिती.

१.	डॉ. महेंद्र ढोरे, प्र-कुलगुरू	अध्यक्ष
२.	डॉ. सुभाष एस गवई	सदस्य
३.	डॉ. अंबादास एल कुलट	सदस्य
४.	डॉ. अनुराधा जी वैद्य	सदस्य
५.	श्री. रितेश व्ही खुलसाम	सदस्य

ब) "समान संधी कक्ष (Equal Opportunity Cell), व्यवसाय समुपदेशन व मार्गदर्शन कक्ष (Career Counselling & Guidence Cell), रोजगार कक्ष (Placement Cell), संगीत, कला आणि सांस्कृतिक कक्ष (Music, Arts & Cultural Cell), च्या बळकटीकरण करण्याकरिता करावयाची उपाययोजना व घ्यावयाचे कार्यक्रम/कार्यशाळा यांच्या कार्यपद्धतीचे निर्धारण" याकरिता विनियम क्र.२०/२०२२ अन्वये धोरण निश्चित करण्यात आले आहे.

विनियम क्र.२०/२०२२ चे तरतुदीनुसार उपरोक्त नमुद कक्षांकरिता सत्र २०२४-२०२५ करिता खालीलप्रमाणे महाविद्यालयामध्ये कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते.

अ. क्र.	**महाविद्यालयाचे नाव**	**कायर्शाळेचे नाव**	**आयोजनाचा दिनांक**
०१.	जे.डी.पाटील सांगळूदकर महाविद्यालय, दर्यापूर, अमरावती	समान संधी कक्ष (Equal Opportunity Cell)	३०.०१.२०२५
०२.	डॉ. बाबासाहेब आंबेडकर कॉलेज ऑफ जर्नालिझम ॲन्ड सोशल वर्क, अकोला		१६.०१.२०२५
०३.	नारायणराव नागरे कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, दुसरबीड, जि.बुलडाणा		२४.०१.२०२५
०५.	या.द.व.देशमुख कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, तिवसा	**व्यवसाय समुपदेशन व मार्गदर्शन कक्ष** (Career counselling & Guidence Cell)	२१.०१.२०२५
०६.	श्री राधाकिसन लक्ष्मीनारायण तोष्णीवाल विज्ञान महाविद्यालय, अकोला		२८.०१.२०२५
०७.	श्री ज्ञानेश्वर मस्कुजी बुरूंगले विज्ञान व कला महाविद्यालय, शेगांव, जि. बुलडाणा		२७.०१.२०२५
०८.	जिजामाता कला महाविद्यालय, दारव्हा		२२.०१.२०२५
	श्री. वसंतराव नाईक कला व श्री अमरसिंग नाईक वाणिज्य महाविद्यालय, मंगरुळपीर, जि.वाशिम		२२.०१.२०२५
०९.	स्वामी विवेकानंद कॉलेज ऑफ मॅनेजमेंट सायन्स ॲन्ड आर्टस्, वरुड, जि. अमरावती	**रोजगार कक्ष** (Placement Cell)	१८.०१.२०२५
१०.	श्रीमती महेरबानु विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अकोला		२८.०१.२०२५
११.	श्रीमती तुलसीबाई रंगलालजी झांबड वरिष्ठ महाविद्यालय, नांदुरा, जि. बुलडाणा		२७.०१.२०२५
१२.	श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळ		१७.०१.२०२५
	मातोश्री सुभद्राबाई पाटील कला-विज्ञान व कै.पांडुरंगजी ठाकरे वाणिज्य महाविद्यालय, मानोरा, जि.वाशिम		२२.०१.२०२५

अ. क्र.	महाविद्यालयाचे नाव	कायर्शाळेचे नाव	आयोजनाचा दिनांक
१३.	श्री शिवाजी कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला	संगीत, कला आणि सांस्कृतिक कक्ष (Music, Arts & Cultural Cell)	३१.०१.२०२५
१४.	जी.एस.विज्ञान, कला व वाणिज्य महाविद्यालय, खामगांव, जि. बुलडाणा		१५.०१.२०२५
१५.	बाबाजी दाते कला-वाणिज्य महाविद्यालय, यवतमाळ		३०.०१.२०२५
	रा. आ. कला, श्री मि. क. वाणिज्य व श्री स.रा.राठी विज्ञान महाविद्यालय, वाशिम		२३.०१.२०२५
	ह. व्या. प्र. मंडळाचे अभियांत्रिकी व तांत्रिकी महाविद्यालय, अमरावती		२०.०१.२०२५

क) पंडित दिनदयाल उपाध्याय विभागीय रोजगार मेळावा :

सत्र २०२४-२०२५ मध्ये विद्यापीठाद्वारे संलग्नित महाविद्यालयांतील व विद्यापीठाचे शैक्षणिक विभागातील विद्यार्थ्यांकरिता कौशल्य विकास, रोजगार उद्योजकता, विभागीय आयुक्तालय अमरावती आणि विद्यार्थी विकास विभाग, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ यांचे संयुक्त विद्यमाने पंडित दिनदयाल उपाध्याय विभागीय रोजगार मेळावा अंतर्गत लीड कॅम्पस हायरींग, टी.सी.एस.पुणे या नामांकित कंपनीद्वारे 'TCS BPS of Campus Drive' चे आयोजन दिनांक ०३ ऑगस्ट, २०२४ रोजी सकाळी १०.०० वाजता दृकश्राव्य सभागृह, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे करण्यात आले होते.

कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता, विभाग आयुक्तालय, अमरावती आणि विद्यार्थी विकास विभाग, संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांच्या संयुक्त विद्यमाने टि.सी.एस. कंपंनीद्वारे रोजगार मेळाव्यामध्ये २६६ विद्यार्थी मुलाखतीस पात्र ठरले व ३५ विद्यार्थ्यांची निवड टि.सी.एस. (टाटा) कंपनीमध्ये करण्यात आली. ही बाब संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाकरिता अत्यंत भूषणावह आहे.

सदर मेळाव्याकरीता अध्यक्ष म्हणून डॉ.मिलिंद बारहाते, कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, उद्घाटक म्हणून श्री.सौरभ कटियार, भा.प्र.से. जिल्हाधिकारी, अमरावती, तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. महेंद्र ढोरे, प्र.कुलगुरू, संगाबाअवि, डॉ. अविनाश असनारे, कुलसचिव, संगाबाअवि, राज्यपाल नामित व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. रविंद्र कडू, सिनेट सदस्य श्री. आशिष सावजी, श्री.संजय जाधव, उद्योजक, जाधव ग्रुप ऑफ इंडस्ट्रिज, अमरावती, श्री. विशाल रामपल्ले, लीड कॅम्पस हायरींग, टीसीएस, पुणे, श्री.दत्तात्रय ठाकरे, उपायुक्त, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र, अमरावती हे प्रामुख्याने उपस्थित होते.

सर्व मेळाव्याच्या यशस्वी आयोजनात विद्यार्थी विकास विभागाचे संचालक श्री. राजीव बोरकर आणि सर्व संबंधित महाविद्यालयांचे प्राचार्य, पदस्थापित अधिकारी, शिक्षेकत्तर कर्मचारी यांनी पूर्ण सहकार्य करून महत्त्वाची भूमिका निभावली. त्याबद्दल सर्वांचे आभार व्यक्त करण्यात आले.

ड) नोंदणीकृत विद्यार्थी संघटना :

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाशी संलग्नित पाचही जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना येणा-या विविध समस्या व त्या समस्यांचे निराकरण व्हावे याकरिता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार, नोंदणीकृत विद्यार्थी संघटनेच्या पदाधिका-यांची सभेचे आयोजन मा. कुलसचिव यांचे अध्यक्षतेखाली दिनांक १२.०८.२०२४ व २१.०१.२०२५ रोजी करण्यात आले होते.

इ) छत्रपती श्री शिवाजी महाराजांच्या ३५० व्या शिवराज्यभिषेक सोहळा :

दिनांक १७.०२.२०२४ रोजी संपन्न झालेल्या व्यवस्थापन परिषद सभेमध्ये विषय क्र. ३१ अन्वये व दिनांक ०५.०४.२०२४ रोजी संपन्न झालेल्या विद्यार्थी विकास मंडळाने विषय क्र.०९ अन्वये घेतलेल्या निर्णयानुसार विद्यार्थी विकास विभाग व राष्ट्रीय सेवा योजना यांचे संयुक्त विद्यमाने छत्रपती श्री शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या शिवराज्याभिषेक सोहळ्यानिमित्त **डॉ.सतपाल सोवळे, यवतमाळ** यांचे **"छत्रपती शिवाजी महाराजः भारतीय युवकांसाठी दीपस्तंभ"** या विषयावर व्याख्यानाचे आयोजन शनिवार दिनांक ०३ ऑगस्ट, २०२४ रोजी दुपारी ३.०० वाजता डॉ.श्रीकांत जिचकार मेमोरिअल रिसर्च सेंटर, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ येथे करण्यात आले होते.

सदर कार्यक्रमाकरीता अध्यक्ष म्हणून **डॉ. मिलिंद बारहाते, कुलगुरू,** संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ हे होते. तर प्रमुख अतिथी म्हणून डॉ. महेंद्र ढोरे, प्र-कुलगुरू, रविंद्रजी कडू, मा.राज्यपाल नामित सदस्य, व्यवस्थापन परिषद, डॉ. भैयासाहेब मेटकर, सदस्य, व्यवस्थापन परिषद, मा.प्रा.श्रीकांत काळीकर, अधिसभा सदस्य उपस्थित होते. तसेच विद्यापीठातील विविध प्राधिकरणांचे पदाधिकारी, सर्व पदव्युत्तर शैक्षणिक विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक वर्ग, प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी व पदव्युत्तर शैक्षणिक विभागातील विद्यार्थी तसेच अमरावती शहरातील स्थानिक महाविद्यालयांतील राष्ट्रीय सेवा योजनेचे विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

६) आंतर महाविद्यालयीन स्पर्धा आयोजन :

विद्यापीठ आणि आंतर विद्यापीठ तसेच अखिल भारतीय आंतर विद्यापीठ स्तरावर सांस्कृतिक स्पर्धामध्ये संलग्नित महाविद्यालयांच्या आणि विद्यापीठ शैक्षणिक विभागांच्या विद्यार्थ्यांचा सहभाग वाढावा, त्यांच्यातील सुप्तगुणाचा विकास व्हावा यादृष्टीने संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ व विद्यार्थी विकास मंडळ प्रयत्नशील असून सातत्याने प्रगती पथाकडे वाटचाल करीत आहे.

आंतर महाविद्यालयीन युवा महोत्सव आयोजन :

विद्यार्थ्यांमध्ये राष्ट्रीय भावना वाढीस लागावी तसेच त्यांच्यातील कलागुणांना व कलात्मक मूल्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी दरवर्षी आवर्जून विद्यापीठ युवा महोत्सवाचे आयोजन केले जाते. या हेतूने २०२४-२०२५ या सत्रात युवा महोत्सवाचे आयोजन **शंकरलाल खंडेलवाल कला-विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अकोला येथे दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२४** या कालावधित यशस्वीरित्या करण्यात आले.

या युवा महोत्सवाचा उद्घाटन समारंभ संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मिलिंद बारहाते यांचे अध्यक्षतेखाली, तर उद्घाटक म्हणून श्री. अनुपजी धोत्रे, खासदार, अकोला हे होते. तसेच या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून श्री. अजितजी कुंभार, जिल्हाधिकारी, अकोला हे होते तर प्रमुख उपस्थिती डॉ. महेंद्र ढोरे, प्र.कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, श्रीमती ताराबाई हातवळणे,

अध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, अकोला, श्री. अरुणजी कुळकर्णी, उपाध्यक्ष व कोषाध्यक्ष, शिक्षण प्रसारक मंडळ, अकोला, श्री. गोपालजी खंडेलवाल, सचिव, शिक्षण प्रसारक मंडळ, अकोला हे होते. तर संयोजक म्हणून प्रा.डॉ. जगदीश साबू, प्राचार्य, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला, सांस्कृतिक चमू निवड समिती सदस्य डॉ. राहुल एकबोटे, अमोलकचंद महाविद्यालय, यवतमाळ, डॉ.निखिलेश नलोडे, श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळ, डॉ. सावन देशमुख, भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि. अमरावती, डॉ. नेत्रा मानकर, श्री शिवाजी कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला, श्री सुरज हेरे, ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती व डॉ. राजीव बोरकर, संचालक, विद्यार्थी विकास संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे विशेष उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता.

या युवा महोत्सवाचा समारोप समारंभ सोमवार दिनांक ३० सप्टेंबर २०२४ रोजी डॉ. मिलिंद बारहाते, कुलगुरू, संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे अध्यक्षतेखाली, श्री. निलेश जळमकर, लेखक-दिग्दर्शक, मराठी चित्रपट सृष्टी, श्री. अंकुर वाढवे, 'चला हवा येऊ द्या' फेम कलावंत, मुंबई, आमदार श्री. वसंतजी खंडेलवाल, सदस्य, शिक्षण प्रसारक मंडळ, अकोला, ॲड. गिरीशजी देशपांडे, सदस्य, शिक्षण प्रसारक मंडळ, अकोला यांचे प्रमुख उपस्थितीमध्ये तर प्रा. डॉ. जगदीश साबू, प्राचार्य, शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय, अकोला, विद्यार्थी विकास मंडळ सदस्य डॉ. निखिलेश नलोडे, श्रीमती नानकीबाई वाधवाणी कला महाविद्यालय, यवतमाळ, डॉ.शर्मिला अरविंद देशमुख, महिला महाविद्यालय, जोग चौक, अमरावती, डॉ.सावन देशमुख, भारतीय महाविद्यालय, मोर्शी, जि. अमरावती, डॉ. नेत्रा मानकर, श्री शिवाजी कला-वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, अकोला, डॉ. सौ. सीमा विनोदराव देशमुख, महिला महाविद्यालय, खामगांव व डॉ.राजीव बोरकर, संचालक, विद्यार्थी विकास संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती यांचे उपस्थितीत आयोजित करण्यात आला होता.

हा युवा महोत्सव अखिल भारतीय विद्यापीठ संघ, नवी दिल्ली यांच्या मार्गदर्शक संहितेप्रमाणे घेण्यात आला. या महोत्सवात दिनांक २७ सप्टेंबर, २०२४ ते ३० सप्टेंबर, २०२४ पर्यंत एकांकिका, स्किट, माईम, लोकनृत्य, सुगम संगीत, शास्त्रीय गायन, समूहगान, पाश्चात्य गायन, शास्त्रीय नृत्य, स्वर वाद्य, तालवाद्य, स्पॉट पेंटींग, पोस्टर मेकींग, कोलाज, कार्टूनिंग, क्ले मॉडेलिंग, रांगोळी, वादविवाद व वक्तृत्व स्पर्धा आणि क्विझ, फोक ऑर्केस्ट्रॉ इत्यादी नाविण्यपूर्ण स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांमध्ये फार मोठ्या प्रमाणावर पाचही जिल्ह्यातील महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थीनी सहभागी झाले होते. संपूर्ण अकोला शहर व संपूर्ण अकोला विभागातील परिसर या महोत्सव कालावधीत विद्यार्थ्यांच्या कलागुण सादरीकरणाने भारावून गेला होता.

या युवा महोत्सवामध्ये प्रत्येक स्पर्धा प्रकारात प्रथम, द्वितीय व तृतीय बक्षीसे देण्यात आली. सदर पुरस्कार हे आयोजित करण्यात आलेल्या एकूण विविध २७ कला प्रकारांमध्ये प्रदान करण्यात आले. या महोत्सवामध्ये सहभागी झालेल्या महाविद्यालयांपैकी ज्या महाविद्यालयांनी सर्वाधिक गुण संपादन केलेत अशा महाविद्यालयांना सर्वसाधारण विजेता म्हणून पुरस्कार सुद्धा प्रदान करण्यात आलेले आहेत. यावर्षी सर्वसाधारण विजेता पुरस्काराकरिता श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती यांचेकडे सदर फिरते चषक प्रदान करण्यात आले.

हा महोत्सव यशस्वी करण्यासाठी विद्यापीठाचे सांस्कृतिक समितीचे सन्माननीय सदस्य यांनी अथक परिश्रम घेतले. त्याचप्रमाणे शंकरलाल खंडेलवाल कला-विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, अकोला येथील प्राचार्य, सर्व शिक्षण विभागांचे विभाग प्रमुख, प्राध्यापक, विद्यार्थी व कर्मचारीवृंद यांचे या महोत्सवाच्या

संचलनात बहुमोल सहकार्य लाभले. या महोत्सवात २०३ महाविद्यालय प्रवेशित असून २८५० विद्यार्थी सहभागी झाले होते.

७) आंतर विद्यापीठ युवामहोत्सवामध्ये सहभागी विद्यापीठ चमूंची कामगिरी :

अ) पश्चिम विभाग आंतर विद्यापीठ युवा महोत्सव चमू -

सत्र २०२४-२०२५ मध्ये संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ युवा महोत्सव चमू डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला येथे दिनांक ७ ते ११ नोव्हेंबर, २०२४ या कालावधीत संपन्न झालेल्या इंद्रधनुष्य राज्य आंतर विद्यापीठ युवा महोत्सव स्पर्धेत सहभागी झाली होती.

या स्पर्धेमध्ये विद्यापीठाच्या युवा महोत्सव चमूने व चमूतील कलावंतांनी खालील प्रमाणे कला प्रकारामध्ये सुयश संपादन केले.

कलाप्रकार, स्पर्धक, कलावंत व साथीदार यांची यादी

अ.क्र.	स्पर्धक/कलावंत/ साथीदारांचे नाव	महाविद्यालयांचे नाव	प्रावीण्य स्थान
०१	**पाश्चिमात्य समूहगायन**		**तृतीय**
i	कु. शिवाणी निखाडे	श्री शिवाजी कला, वाणिज्य व विज्ञान महा., अकोला	
ii	कु. रक्षीता मेश्राम	श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, अमरावती	
iii	कु. कोमल ढोके	महिला महाविद्यालय, अमरावती	
iv	श्री शिवम शर्मा	ब्रजलाल बियाणी विज्ञान महाविद्यालय, अमरावती	
